2014-15

**Diamond Publications**

264/3 Shaniwar Peth, 302 Anugrah Apartment, Third Floor, Near Omkareshwar Temple, Pune - 411 030.
Tel. : (020) 24452387, 24466642. Email : info@diamondbookspune.com

जावक क्र. डी.पी./२०१४-१५ क्र. ६३

दि. २३-०९-२०१४

प्रति,
माननीय प्राचार्य,
श्री. शिवछत्रपती कॉलेज
जुन्नर

श्री शिवछत्रपती महाविद्यालय
बोडकेनगर, जुन्नर (पुणे)
आवक नंबर - 402
दिनांक -26/ 9/2014

**विषय : दर वर्षीप्रमाणे डिसेंबर २०१४मध्ये 'शैक्षणिक पुस्तक प्रदर्शन' भरविण्यासाठी परवानगीच्या संदर्भात**

महोदय,

डिसेंबर २०१४ मध्ये आम्हाला पुस्तक प्रदर्शनासाठी परवानगी मिळावी, म्हणून हे विनंतीवजा पत्र पाठवत आहोत. पुस्तकांची ने-आण, माणसे इ. खर्च डायमंड पब्लिकेशन्सतर्फे उचलला जाईल. केवळ एक वर्ग, पुस्तके मांडण्यासाठी टेबल यांची उपलब्धता व गेस्ट हाउसवर राहण्याची व्यवस्था आपण करावी. तसेच प्रदर्शनासाठी परवानगी द्यावी, ही नम्र विनंती. कळावे.

आपला

पाटे द.गं.

दत्तात्रेय गं. पाष्टे
(डायमंड पब्लिकेशन्सकरिता)

प्रा. L.N. घोरपडे

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे
# श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)
एस./आर.नं. महा./ ६६७/ पुणे, दिनांक २/१/१९७० कला - वाणिज्य - विज्ञान पी.टी.आर. एफ.: ४३९/ पुणे, दिनांक ३१/१२/१९६९
'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्राप्त - पुणे विद्यापीठ
प्रभारी प्राचार्य डॉ. भास्कर शेळके एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
मोबाईल नं. ९८९०६ ८६५२१
'नॅक' - मुल्यांकीत 'अ'
• बोडकेनगर, जुन्नर, जि. पुणे, पीनः ४१० ५०२.
• दूरध्वनी क्र. : ०२१३२-२२२०९४ • फॅक्सः ०२१३२-२२२१५०
• वेब साईटः www.ssccollegejunnar.com • ई-मेलः ssccj@yahoo.co.in

जावक क्रमांक - एसएससीजे : 2014-15/106 दिनांक : 17-10-2014

प्रति,

मा. व्यवस्थापक
डायमंड पब्लिकेशन्स,
२६४/३ शनिवार पेठ,
३०२ अनुग्रह अपार्टमेंट,
ओंकारेश्वर मंदिराजवळ,
पुणे ४११०३०

विषय: ग्रंथप्रदर्शन भरविण्यास परवानगी बाबत.
संदर्भ : आपले पत्र क्र. डी.पी./२०१४-१५ क्र. ६३ दि. २३/०९/२०१४

महोदय,

आपल्या उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार आम्ही आपणास आमच्या महाविद्यालयात दि. २७ ते ३० नोव्हेंबर २०१४ या कालावधीत ग्रंथप्रदर्शन भरविण्यास परवानगी देत आहोत. प्रदर्शन भरविण्यासाठी आपणास पुरेशी जागा व फर्निचर महाविद्यालयामार्फत उपलब्ध करुन दिले जाईल. तसेच आपल्या निवासाची व्यवस्था महाविद्यालयाच्या अतिथीगृहात केली जाईल. प्रदर्शनात वाचकांना जास्तीत जास्त विषयांवरील पुस्तके पाहण्यासाठी व खरेदीसाठी प्रदर्शित करावीत ही विनंती.

कळावे

आपले

श्री. एल. एन. थोरात
ग्रंथपाल
श्री शिव छत्रपती महाविद्यालय
जुन्नर, जि. पुणे.

डॉ. बी. टी. शेळके
प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

www.epunyanagari.com
पुणे शहर
पुण्य नगरी
पुणे, मंगळवार, २ डिसेंबर २०१४
3

# शिवछत्रपती महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनास प्रतिसाद

**। जुन्नर : प्रतिनिधी**

येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या सहकार्याने पुणे येथे डायमंड पब्लिकेशन्सने भरविलेल्या मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ प्रदर्शनास रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाल्याची माहिती डायमंड पब्लिकेशन्सचे संचालक दत्तात्रेय पाष्टे यांनी दिली.

दि. २७ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत भरविलेल्या या प्रदर्शनास सुमारे तीन हजार ग्रंथप्रेमींनी भेट देऊन खरेदी केली.

प्रदर्शनाचे उद्‍घाटन दि. २७ नोव्हेंबरला ज्येष्ठ पत्रकार दत्ता म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मण देवरे, संस्था अध्यक्षांचे प्रतिनिधी प्रा. विलास कुलकर्णी, ग्रंथपाल प्रा. लक्ष्मण थोरात, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. संजय काळे व विश्वस्त मंडळाच्या प्रोत्साहनातून महाविद्यालयात दरवर्षी राबविला जातो, असे प्र. प्राचार्य डॉ. भास्कर शेळके व ग्रंथपाल प्रा. लक्ष्मण थोरात यांनी सांगितले.

Scanned by CamScanner

सकाळ
पुणे, मंगळवार,
२ डिसेंबर २०१४

# जुन्नरला प्रदर्शनास ग्रंथप्रेमींची भेट

**जुन्नर, ता. १ :** श्री शिवछत्रपती महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग व डायमंड पब्लिकेशन्सच्या वतीने आयोजित ग्रंथप्रदर्शनास सुमारे तीन हजार ग्रंथप्रेमींनी भेट देऊन विविध विषयांवरील पुस्तकांची खरेदी केली, अशी माहिती संचालक दत्तात्रेय पाष्टे यांनी दिली.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात २७ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत या प्रदर्शनाचे आयोजन केले होते. 'सकाळ'चे बातमीदार दत्ता म्हसकर, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, उपप्राचार्य लक्ष्मण देवरे, संस्था प्रतिनिधी प्रा. विलास कुलकर्णी, ग्रंथपाल प्रा. लक्ष्मण थोरात यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. या वेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. समाजात वाचन संस्कृती वाढावी



जुन्नर : ग्रंथप्रदर्शनात पुस्तके पाहताना विद्यार्थी व प्राध्यापक.

तसेच दर वर्षी प्रकाशित होणाऱ्या नवनवीन पुस्तकांची माहिती व्हावी, या हेतूने ग्रंथप्रदर्शनाचा उपक्रम आठ वर्षांपासून करण्यात येत आहे. वाचकांकडून यास दर वर्षी वाढता प्रतिसाद मिळत आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय काळे तसेच विश्वस्त मंडळाचेही या उपक्रमास प्रोत्साहन मिळाले.

मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील पुस्तकांना रसिकांकडून प्रतिसाद मिळत असल्याचे प्राचार्य शेळके यांनी सांगितले.

Scanned by CamScanner

दि.२७ ते ३० नोव्हेंबर २०१४

# डायमंडचे भव्य पुस्तक प्रदर्शन !

**इंग्रजी पुस्तकेही उपलब्ध !**

अर्थशास्त्र | मराठी | चरित्र

राज्यशास्त्र | स्पर्धा परीक्षा

इतिहास | समाजशास्त्र | इंग्रजी | भूगोल

पर्यावरणशास्त्र | वाणिज्य | व्यक्तिमत्त्व विकास

इंग्रजी साहित्य | कथा | कादंबरी

इंग्रजी-मराठी कोश वाङ्मय

अनुवादित साहित्य | बालवाङ्मय



स्थळ : श्री शिव छत्रपती महाविद्यालय, ग्रंथालय, जुन्नर जि. पुणे

वेळ : सकाळी ९ ते रात्री ८

संपर्क : मो. : ९८८१४७३४१६

स्पर्धा परीक्षांसाठी अनेक प्रकाशनांची प्रचंड पुस्तके उपलब्ध !

प्रमुख प्रकाशकांची इंग्रजी-मराठी पुस्तके उपलब्ध !

**डायमंड पब्लिकेशन्स**

☎ (०२०) २४४५२३८७, (०२०) २४४६६६४२.

info@diamondbookspune.com www.diamondbookspune.com

Scanned by CamScanner